# दिवा न्यूज

दिशादर्शक, मार्गदर्शक!

www.diwanews.com



आता डिजिटल स्वरूपात...

दिवा न्यूजची वेबसाईट सुरू..!

ताज्या घडामोडी आणि बातम्यांसाठी लॉग इन करा

www.diwanews.com

आता कुठेही असा...दिवा न्यूज वाचा एका क्लिक वर..

epaper.diwanews.com



▶ वर्ष–२ ■ अंक–३७ ■ epaper.diwanews.com ■ सोमवार, १७ एप्रिल २०२३ ■ पाने–८ ■ किंमत ४ रु. RNI No.-MAHMAR/2021/80669


# दिवा मनसे टोरंटला शॉक देण्याच्या तयारीत!

## टोरंटचा दिव्यात मनमानी कारभार सुरू असल्याची नागरिकांची तक्रार



## मनसेची टोरंट कार्यालयावर धडक

**दिवा:– दिव्यातील नागरिकांना टोरंट वीज वितरण कंपनी कडून होत असलेल्या त्रासा विरोधात दिवा मनसेने रणशिंग फुंकले असून टोरंट कंपनीचा कारभार येत्या काही दिवसात सुधारला नाही तर मनसे स्टाईल आंदोलन करण्याचा इशारा दिला मनसेचे शहर अध्यक्ष तुषार पाटील यांनी दिला आहे.**

टोरंट पॉवर कडून दिवा शहरातील नागरिकांना चुकीच्या पद्धतीने वेठीस धरले जात असल्याचे दिवा मनसे कडून सांगण्यात आले आहे. टोरंट पॉवर कडून घेतल्या जाणाऱ्या आडमुठेपणामुळे लोकांना नाहक त्रास सहन करावा लागतोय. नोटीस किंवा आगाऊ पूर्वसूचना न देता वीज कनेक्शन तोडणे, ग्राहकांशी उद्धटपणे बोलणे, (पान ३ वर)

# दिव्यातील नाले तुडुंब भरलेले!

## पावसाळ्याआधी दिव्यातील नालेसफाई करा, नागरिकांची मागणी

**दिवा:–** शहरातील सर्वच नाले कचरा व गाळाने तुडुंब भरलेले असून हे नाले पावसाळ्याआधी साफ होणे गरजेचे आहे. दरवर्षी दिवा शहरातील नाले हे पावसाच्या सुरुवातीला साफ करण्यास सुरुवात होत असल्याने सदर नाले खोलवर साफ होत नाहीत परिणामी शहरात अनेक भागात पाणी साचण्याचे प्रकार घडतात. पावसाला सुरू होण्याआधी मे महिन्यात सर्व नाले साफ करून सदर नाल्यांचे खोलीकरण करणे आवश्यक असल्याचे मत शहरातील नागरिक व्यक्त करत आहेत. वेळेवर पालिका प्रशासन नालेसफाई करत नाही आणि पावसाळ्यात नालेसफाईची धावाधाव सुरू होते असा दिव्याचा अनुभव असल्याचे नागरिकांनी सांगितले. नाल्या शेजारी असणाऱ्या वस्त्यांमध्ये पाणी साचू नये, शहरातील नागरी वस्त्यांमध्ये पाणी साचू नये यासाठी वेळेवर नाली सफाई करावी अशी मागणी येथील नागरी करत आहेत.



# अग्निशमन सेवा सप्ताहास आरंभ

## आयुक्त अभिजीत बांगर यांनी वाहिली शहिदांना श्रद्धांजली



**ठाणे** :अग्निशमन दिनाच्या निमित्ताने ठाणे महापालिकेच्या अग्निशमन दलाने सेवा सप्ताह आयोजित केला आहे. या सप्ताहाचा आरंभ शहीद जवानांना श्रद्धांजली वाहून शुक्रवारी करण्यात आला. त्या निमित्ताने ठाणे महापालिकेचे आयुक्त अभिजीत बांगर यांनी बाळकूम अग्निशमन केंद्रात शहीद स्तंभाला अभिवादन केले.

यावप्रसंगी ठाणे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त (१) संदीप माळवी, अतिरिक्त आयुक्त (२) संजय हेरवाडे, उपायुक्त जी. जी. गोदेपुरे, उपायुक्त प्रशांत रोडे, अग्निशमन दलाचे प्रमुख गिरीश झळके आदी उपस्थित होते. याचवेळी, महाराष्ट्र फायर सर्व्हीस असोसिएशनच्या देणगी पेटीचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले,मुंबई बंदरात १४ एप्रिल, १९४४ रोजी लागलेल्या आगीत ७१ अग्निशमन जवान शहीद झाले होते. त्यांच्या स्मरणार्थ अग्निशमन दिन साजरा केला जातो. त्या निमित्ताने १४ एप्रिल ते २१ एप्रिल या काळात ठाणे अग्निशमन दलातर्फे शहरभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. त्यात, विविध आस्थापना, सोसायटी येथे अग्निसुरक्षेबाबतची प्रात्यक्षिके करण्यात येतील. त्याचप्रमाणे विवियाना मॉल येथे प्रदर्शनाचेही आयोजन करण्यात आले.

# ठाण्यात भाजी विक्रेत्यांचा बंद

## न्याय मिळत नाही तोपर्यंत आंदोलन सुरू राहणार

**ठाणे:** तात्पुरते बसविलेल्या अनधिकृत फेरीवाल्यांना हप्ते घेऊन कायमस्वरूपी बसण्याचा काही मंडळींचा डाव आहे. त्याच्याविरोधात ठाण्यातील छत्रपती शिवाजी भाजी विक्रेता संघ आणि जिजामाता भाजी – फळ सेवा संघ या संघटनेच्या जवळपास ३५० अधिकृत विक्रेत्यांनी शनिवारपासून बेमुदत बंद पुकारला. यामुळे भाजी आणि फळ बाजारात या बंदमुळे शुकशुकाट पसरला होता. तसेच पहिल्याच दिवशी विक्रेत्यांनी कडकडीत बंद पाळला. तर यावेळी, प्रशासनामुळे आमच्यावर उपासमारीची वेळ आल्याचा आरोपही केला. तसेच ठाणेकर नागरिकांना वेठीस धरण्याचे कामही प्रशासनामार्फत होत आहे. त्यामुळे जोपर्यंत न्याय मिळत नाही तोपर्यंत हे आंदोलन सुरूच राहणार असल्याचा इशाराही आंदोलन कर्त्यांनी दिला. दरदिवशी नेहमीप्रमाणे ठाणे,पुणे आणि नाशिक या जिल्ह्यातून भाजी बाजारात येणारे १५ ते २० ट्रक या आंदोलनामुळे आलेच नसल्याचे आंदोलनकर्त्यांनी सांगण्यात आले.

गेल्या ४० ते ५० वर्षांपासून येथे भाजी आणि फळ विक्रेते होलसेल दरात आपला व्यवसाय जांभळी नाका येथे करत आहेत. मात्र, पहाटे तीन वाजल्यापासून सकाळी १० वाजेपर्यंत मंडई बाहेरील रस्त्यावर अनधिकृत विक्रेते बसतात. त्यांच्या बाबत वारंवार तक्रार करून ही काही होत नाही.

त्यांच्यावर पोलीस, महापालिका अधिकारी आणि कर्मचारी तसेच गावगुंडाचा हात आहे. दिवसेंदिवस वाढत्या अनधिकृत विक्रेत्यांमुळे अधिकृत विक्रेत्यांवर उपासमारीची वेळ ओढवली आहे. याच्या निषेधार्थ शनिवारपासून ३०० ते ३५० विक्रेत्यांनी बेमुदत बंद पुकारला आहे.

**संपादक**
सुहास खंडागळे
**व्यवस्थापक**
सौ. अरुणा किरण जाधव
मो. ९९८७५१२००१
**छायाचित्रकार/प्रतिनिधी**
सुदेश सकपाळ
**वितरण प्रतिनिधी**
संतोष मदने
**ऑफीस पत्ता :-**
गाळा नं. ०६, आई जीवदानी कॉम्प्लेक्स, हरिश्चंद्र अपार्टमेंटच्या मागे,वारेकर शाळेजवळ, गुरुदर्शन नगर, मुंब्रादेवी कॉलनी रोड, दिवा (पूर्व), ठाणे-४००६१२.

# ठाण्यात पाण्यासाठी भाजप काढणार लॉग मार्च

## आमदार संजय केळकरांचा महापालिकेला अल्टीमेटम

**ठाणे: घोडबंदरला पाणीटंचाईने उग्र रूप धारण केले असून त्यावर तोडगा काढण्याऐवजी महापालिका टँकरमाफियांना पोसत असल्याचा आरोप आमदार संजय केळकर यांनी केला आहे. त्यामुळे घोडबंदर रोडवर भीषण पाणी टंचाई निर्माण झाल्याने येथील जवळ जवळ ३० गृहसंकुलातील रहिवासियांनी आमदार संजय केळकर यांची पाण्याच्या विषयात भेट घेतली. तातडीने आमदारांनी महापालिका अधिकाऱ्यांची भेट घेत, त्यांनी महापालिकेने नविन इमारतीना परवानगी देणे बंद केले पाहीजे तेव्हा, येत्या दहा दिवसात पाण्याचे नियोजन न केल्यास स्वत: रस्त्यावर उतरून ठाणे महापालिकेवर लॉंग मार्च काढणार असल्याचा इशारा दिला.**

ठाणे शहरातील पाणी टंचाईच्या प्रश्नावर मागील सहा महिन्यात आमदार केळकर यांनी अनेक मोर्चे - आंदोलने केली. तसेच, विधीमंडळातही आवाज उठवला. परंतु, परिस्थितीत फरक पडलेला नाही. या पार्श्वभूमीवर घोडबंदर भागातील पाणी टंचाईने त्रस्त झालेल्या रहिवाश्यांनी बुधवारी ठाणे महापालिकेत आमदार केळकर यांची भेट घेऊन कैफियत मांडली. आमदार केळकर यांनी रहिवाश्यासमवेत महापालिका अधिकाऱ्यांची बैठक घेऊन वस्तुस्थिती मांडली. घोडबंदर रोडवरील गृहसंकुलांसाठी ५० एमएलडी पाणी केवळ कागदोपत्री मंजुर आहे. परंतु प्रत्यक्षात अंमलबजावणीच न झाल्याने टॅकरद्वारे पाणी पुरवठा केला जात आहे. घोडबंदरच्या सुमारे ३० इमारती टँकरसाठी अव्वाच्या सव्वा रक्कम मोजत आहेत. पाण्याची इतकी टंचाई असताना महापालिका मात्र नवनवीन बांधकामांना परवानग्या देत असल्याने उच्च न्यायालयात याबाबत याचिका देखील दाखल करण्यात आली होती. त्यावर न्यायालयाने पुरेसे पाणी पुरवता येत नसेल तर, नवीन बांधकामांना परवानगी देण्यात येऊ नये, असे आदेश दिले होते. त्यावर ठाणे महापालिकेने पुरेसा पाणी पुरवठा करू, असे प्रतिज्ञापत्र सादर केले. तरीही ठाणे शहरातील अनेक भागात आजही पाणी टंचाई असूनही पालिका बहुमजली इमारतींना परवानगी देत आहे. शहरात ५० मजल्यांच्या १५ इमारती आणि एक ७२ मजली इमारतीला परवानगी दिली आहे. आधीच पाणी टंचाई असताना या इमारतींमधील हजारो नागरीकांना पाणी कसे पुरवणार असा प्रश्न आ. केळकर यांनी उपस्थित करून ही नवीन बांधकामे तात्काळ बंद करण्याची मागणी केली. धरणाला पुढची १० वर्षे लागतील तेव्हा धरण धरण करीत बसण्यापेक्षा छोटे बंधारे उभारून कल्पकतेने नियोजन करण्याची सूचना आ. केळकर यांनी केली. तसेच, येत्या १० दिवसाच्या आत हा परिसर टॅकरमुक्त करावा, अन्यथा, स्वतः रस्त्यावर उतरून हिरानंदानी इस्टेट ते ठामपा मुख्यालय असा लॉंग मार्च काढणार. असा इशारा आमदार केळकर यांनी दिला आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक सुहास शांताराम खंडागळे यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया आणि पब्लीकेशन प्रा. लि. प्लॉट क्र. डब्ल्यू २३०, टीटीसी खैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून, श्रीकृपा बिल्डींग, ए-विंग, पहिला माळा, फ्लॅट क्रमांक १०१, सेंट मेरी शाळेजवळ, दिवा (पूर्व), ठाणे-६१२ ता/जि-ठाणे राज्य-महाराष्ट्र येथून प्रकाशित केले. संपर्क-८०८०९७७९५५
**संपादक-सुहास शांताराम खंडागळे RNI No.-MAHMAR/2021/80669**

Printed, Published and Owned by Suhas Shantaram Khandagale and Printed at Siddhakala Print Media & Publication Pvt. Ltd. Plot No. W--230, TTC Industrial Area, Khairane, Navi Mumbai-400710. Dist. Thane, Maharashtra and Published at Shri Krupa Building, A-Wing, First Flr., Flat No. 101, Near Sent Marry School, Diva (E), Thane-400612 Taluka/Dist. Thane, State-Maharashtra. **Editor : Suhas Shantaram Khandagale, RNI No.-MAHMAR/2021/80669**

# मुख्यमंत्री एकनाथ शिंदे लवकरच दिव्यात येणार, रमाकांत मढवी यांची माहिती




## दिव्यातील विकास कामांचे लोकार्पण मुख्यमंत्र्यांच्या हस्ते होणार

**दिवा:**–दिव्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पुढाकाराने व मार्गदर्शनाखाली झालेल्या सुमारे सातशे ते आठशे कोटींच्या विकास कामांच्या लोकार्पणासाठी मुख्यमंत्री लवकरच दिव्यात येणार असल्याची माहिती दिवा शहरप्रमुख रमाकांत मढवी यांनी दिली.

दिवा रेल्वे स्टेशन पूर्वेला नवीन तिकीट घराचे उद्घाटन नुकतेच पार पडले. यावेळी रमाकांत मढवी माध्यमांशी बोलत होते.यावेळी बोलताना रमाकांत मढवी म्हणाले की,दिवा शहराचा कायापालट करण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली मोठ्या प्रमाणावर विकास निधी प्राप्त झाला.मागील पाच वर्षात दिवा शहरात विविध विकासकामे झाली असून शहरात अनेक महत्वकांक्षी प्रकल्प सुरू आहेत. दिव्यातील नागरिकांना दिलासा मिळावा यादृष्टीने शहरात जनतेच्या हिताची कामे होत असून या कामांच्या लोकार्पण सोहळ्याला मुख्यमंत्री दिव्यात लवकरच येतील अशी माहिती रमाकांत मढवी यांनी दिली.

# दिवा मनसे टोरंटला शॉक देण्याच्या तयारीत!

(पान १ वरून)

हिंदू सणांच्या काळात वीज बंद ठेवणे, घरातील विज कनेक्शन कापण्यापूर्वी बिल भरल्याची शहानिशा न करणे, मीटर साठी मागणी करूनही वेळेवर मीटर उपलब्ध न करून देणे या सारख्या अनेक तक्रारी या टोरेंट पॉवर बद्दल दिवा मनसे शहर कार्यालयात आल्या होत्या.

वीज कनेक्शन तोडायला जाणाऱ्या पथकासंदर्भात लोकांच्या सगळ्यात जास्त तक्रारी येत असतात. घरात व्यक्ती उपलब्ध असूनही त्याला न सांगता वीज कापून निघून जाणे, वीज पुरवठा खंडित करत असताना त्याची माहिती न देणे अशा गोष्टी टोरेंट कर्मचाऱ्यांकडून केल्या जातात. अनेकवेळा ग्राहकाने मिटरसाठी पैसे भरूनही चार ते सहा महिने मीटर बसवले जात नाही, त्याच काळात व्हिजिलन्स वाले संबंधित ग्राहकांवर वीज चोरीचा गुन्हा दाखल करतात आणि त्याला लाख रुपयांचा दंड ठोठावतात. या सगळ्या प्रकारात त्या ग्राहकांची काहीही चुकी नसताना त्याला आर्थिक आणि मानसिक त्रासाला सामोरे जावे लागते. टोरेंट पॉवरचे कर्मचारी ग्राहकांशी उद्धटपणे बोलतात त्यामुळे जर टोरेंट पॉवर प्रशासनाने आपल्या कर्मचाऱ्यांना ग्राहकांशी विनम्रपणे बोलण्याच्या योग्य त्या सूचना न दिल्यास त्यांना मनसे आपल्या स्टाईलने दिव्यात धडा शिकवेल असा इशारा दिला मनसेचे शहर अध्यक्ष तुषार पाटील यांनी टोरेंट प्रशासनाला दिला.यावेळी मनसेचे अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

> *दिव्यातील नागरिक आधीच अनेक समस्यांचा सामना करत आहेत.टोरंट कंपनीने येथील नागरिकांच्या सहनशीलतेचा अंत पाहू नये.टोरंट कंपनीचा मनमानी कारभार न सुधारल्यास मनसे स्टाईल आंदोलन केले जाईल!*
> – **तुषार पाटील**, *अध्यक्ष दिवा मनसे*




# बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त सखाराम कॉम्प्लेक्स येथे रक्तदान शिबिराचे आयोजन

**दिवा :– डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३२ व्या जयंती निमित्त प्रमुख मार्गदर्शक माजी नगरसेवक अमर पाटील यांच्या मार्गदर्शनाने सखाराम कॉम्लेक्स सार्वजनिक गणेशोस्तव मंडळ यांच्या सहकार्याने आणि सखाराम कॉम्प्लेक्स युवा पर्व यांच्या अथक प्रयत्नाने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.**



सदर शिबिरामध्ये रक्तदात्यांनी रक्तदान केल्यावर त्यांना प्रमाणपत्र देऊन डॉक्टर टीम कडून सन्मानित करण्यात आले. रक्त संकलित करून छत्रपती शिवाजी हॉस्पिटल कळवा येथील वैद्यकीय कर्मचारी यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले.

या रक्तदान शिबिरासाठी राजीव गांधी मेडिकल कॉलेज आणि छत्रपती शिवाजी महाराज रक्तपेढी विभागाची टीम उपस्थित होती. रक्तदान शिबिरासाठी मंडळाचे युवा पर्व प्रतिनिधी अजित पोवार, कु.मोहन चोपडे, गौरव धुमाळ, रोहन कटरनवरे, आर्यन हडपकर, गौरव भोसले, संकेत घेघडमल, दिनेश कुमावत, संदीप गिरकर आणि इतर युवा वर्गाने कार्यक्रम संपन्न करण्यासाठी मेहनत घेतली. तसेच गणेशोस्तव मंडळाचे अध्यक्ष भीमराव वनंजे, उपाध्यक्ष कृष्णा रिंगे, सचिव शरद पवार, कार्याध्यक्ष पांडुरंग रिंगे सर्व पदाधिकारी कार्यकर्ते आणि महिला संघटक सौ. स्वाती लवांडे महिला मंडळ सौ.संपा शेट्टी, मंदा पोटले, आशा गायकवाड, जयश्री कटरनवरे आणि इतर सर्व महिला यांचेही मोलाचे सहकार्य लाभले.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त दिव्यात भव्य रॅली






**दिवा:–** संयुक्त सार्वजनिक जयंती उत्सव मंडळ दिवा यांच्यावतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३२ व्या जयंतीनिमित्त १४ एप्रिल २०२३ रोजी दिवा शहरामध्ये भव्य रॅली आयोजित करण्यात आली होती.

दिवा स्टेशन येथून सुरुवात होऊन मुंब्रा देवी कॉलनी रोड, दातिवली रोड, ग्लोबल स्कूल, दातिवली तलाव, सम्यक बुद्ध विहार , गणेश नगर येथून वळून बी. आर. नगर. सिद्धार्थ बुद्ध विहार येथे या रॅलीची सांगता करण्यात आली.या निमित्त दिवसभरात विविध कार्यक्रमाचे आयोजित करण्यात आले होते. मंडळाचे अध्यक्ष. आयु एकनाथ भगत ,कार्याध्यक्ष दिनेश पाटील , व सर्व सभासद कार्यकर्ते व महिला,दिवा शहरातील तमाम भीमसैनिक व बहुजन बांधव या रॅलीमध्ये उपस्थित होते.

## मुख्यमंत्री शिंदे यांच्या चरित्रग्रंथाचा १८ एप्रिलला प्रकाशन सोहळा

**ठाणे :** महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा आजवरचा जीवनप्रवास शब्दबद्ध करण्यात आलेल्या 'योद्धा कर्मयोगी : एकनाथ संभाजी शिंदे' या प्रा. डॉ. प्रदीप ढवळ लिखित चरित्रग्रंथाचा प्रकाशन सोहळा मंगळवारी, १८ एप्रिल २०२३ रोजी आयोजित करण्यात आला आहे. महाराष्ट्राचे राज्यपाल रमेश बैस, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, ज्येष्ठ साहित्यिक पद्मश्री मधु मंगेश कर्णिक, पालकमंत्री शंभूराज देसाई, खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवरांच्या हस्ते ठाण्यातील डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृह येथे सायंकाळी ५ वाजता हा प्रकाशन सोहळा संपन्न होणार आहे, अशी माहिती प्रकाशन सोहळ्याच्या आयोजन समितीचे निमंत्रक उद्योग मंत्री उदय सामंत यांनी गुरुवारी ठाणे येथे झालेल्या पत्रकार परिषदेत दूरदृश्य प्रणालीद्वारे दिली.

'**योद्धा कर्मयोगी : एकनाथ संभाजी शिंदे**' या चरित्रग्रंथातून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या जीवनातील अनेक प्रसंग, घटना विस्ताराने मांडण्यात आल्या असून त्यांची कौटुंबिक वाटचाल, त्यांची जडणघडण, संघर्ष, कष्ट, त्यांचे राज्याच्या विकासातील योगदान या साऱ्याचा लेखाजोखा या ग्रंथात मांडला आहे.

ग्रंथाली प्रकाशनाच्या माध्यमातून हा चरित्रग्रंथ प्रसिद्ध होत असून शारदा एज्युकेशन सोसायटी, कोकण मराठी साहित्य परिषद यांच्याद्वारे हा ग्रंथ प्रकाशन सोहळा आयोजित करण्यात आला आहे. यावेळी विविध क्षेत्रांतील मान्यवर, राज्य मंत्रिमंडळातील मंत्री, आमदार, खासदार व अन्य लोकप्रतिनिधी यांच्या उपस्थितीत हा ऐतिहासिक प्रकाशन सोहळा संपन्न होणार आहे.

## दिवा पूर्वेला रेल्वेचे तिकीट घर सुरू






**दिवा:–** रेल्वे स्टेशन मध्ये पूर्वे ला तिकीट घर उपलब्ध व्हावे अशी मागणी अनेक वर्षांपासून येथील रेल्वे प्रवासी करत होते. दिवा शहरातील नागरिकांची ही गरज लक्षात घेऊन रेल्वेने दिवा पूर्व येथे नवीन तिकीट घर उभारले.या तिकीट घराचे उद्घाटन शिवसेना ठाणे जिल्हाप्रमुख नरेश मस्के यांच्या हस्ते पार पडले. यावेळी माजी उपमहापौर रमाकांत मढवी,रेल्वे प्रवासी संघटनेचे अध्यक्ष आदेश भगत, ब्रह्मा शेठ पाटील, माजी नगरसेविका सुनीता मुंडे, गणेश मुंडे आदींसह पदाधिकारी व नागरिक उपस्थित होते.




भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्ताने त्यांना आदरांजली वाहण्यासाठी ठाणे महापालिकेतर्फे शहरातील मुख्य शासकीय इमारती तसेच पूल, पादचारी पूल यांच्यावर निळ्या रंगाची रोषणाई करण्यात आली आहे. महापालिका मुख्यालय, राम गणेश गडकरी रंगायतन, डॉ. काशिनाथ घाणेकर नाटयगृह, जिल्हाधिकारी कार्यालय, नियोजन भवन, जुना आणि नवीन कळवा खाडी पूल, कोपरी, आनंदनगर पादचारी पूल आदींवर ही रोषणाई करण्यात आली आहे.



# 5 हजार दिवावासीयांना देवी एकविरा आईचे दर्शन घडविण्याचा शैलेश पाटील यांचा संकल्प



# पत्रकारांना घडविणारे जेष्ठ पत्रकार...

# शशिकांत कोठेकर



## पत्रकारिता, जनसंपर्क क्षेत्रात विशेष ओळख निर्माण करणारे शशिकांत कोठेकर यांच्या ५० व्या वाढदिवसा निमित्त...

*ठाण्यातील पत्रकारितेत आदराने घेतले जाणारे नाव..शशिकांत कोठेकर!आपल्या पत्रकारितेच्या कारकिर्दीत अनेक नागरी समस्यांना वाचा फोडण्याचे काम कोठेकर सरांनी केले.पत्रकारिता, जनसंपर्क क्षेत्रात काम करताना सरांनी अनेक पत्रकार घडवले... आजही अनेक पत्रकारांना ते मार्गदर्शन करतात!*

*कोठेकर सर सध्या टोरंट पॉवर कंपनीत कळवा मुंब्रा दिवा विभागासाठी पब्लिक रिलेशन् मॅनेजर पदावर काम पाहत आहे.*

*ठाणे शहराची ओळख करून देणारी ठाणे दर्शन सहलींचे आयोजन सरांनी पहिल्यांदा केले . एकंदरीत सहा टूर काढल्या.*

*दरवर्षी पत्रकारीता अभ्यासक्रम शिक्षण घेत असलेल्या किमान एका गरजू विद्यार्थ्याची कोर्स फी शशिकांत सर त्यांच्या मानधनातून भरतात ही त्यांची समाजाप्रती बांधिलकी आहे असे ते मानतात.*

*मराठी व इंग्रजी वर्तमानपत्रातील पत्रकारीतेचा अनुभव. पत्रकारीता अभ्यासक्रम शिकवण्यासाठी यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाने सरांचा मोबाईल क्रमांकच विद्यापीठाच्या वेबसाईटवर प्रसिध्द केला आहे. हा माझा बहुमान असून विद्यापीठाने मोठा विश्वास माझ्यावर टाकलेला आहे असे शशिकांत सर सांगतात. विद्यापीठाच्या वेबसाईटवरील फोन क्रमांकामुळे राज्यभरातील विद्याथी मार्गदर्शनासाठी फोन करत असतात.*

*अनेक पत्रकार त्यानी घडवले. अनेकांच्या पत्रकारीतेमधील नोकरी देखील सरानी सूचवलेला कोर्स केल्यामुळे वाचल्या आहेत. आता पत्रकारीता अभ्यासक्रम बीएमएम कोर्ससाठी देखील त्यानी ठाणे कॉलेजमध्ये सहायक प्राध्यापक म्हणून काम केले आहे.*

*त्यांच्या यशात त्यांची पत्नी प्राध्यापीका कादंबरी कोठेकर यांचा नेहमी सपोट राहिलेला आहे. वडिलांच्या मृत्युनंतर त्यानी लिहिलेल्या व्यक्तीरेखांचे पुस्तक प्रकाशन कवी लेखक प्रवीण दवणे यांच्याहस्ते करून वडिलांप्रती मुलांचे कर्तव्य पार पाडले. सदर पुस्तकाचे पुर्नलेखन-संपादन व प्रकाशन यासाठी कादंबरी कोठेकर यांचेही मोठे योगदान आहे.*

*सफर माणसांची हे नवीन पुस्तक शशिकांत व कादंबरी कोठेकर यानी लिहिले असून अनेक व्यक्तीरेखांचे चित्रण त्यात केले आहे. त्याचेही प्रकाशन लवकरच होणार आहे. लग्नानंतर पहिले पाच वर्षे लग्नाच्या वाढदिवसाच्या निमित्ताने दोन्ही दांपत्य रक्तदान करायचे.*

*पत्रकारीता प्रामाणिकपणे सच्चाईने करता येते हे त्यानी दाखवून दिले. त्यांच्या दोन बातम्यांची दखल मुंबई उच्च न्यायालयाने घेतली असून त्यावर कार्यवाही केली आहे.*

*आनंद दिघे यांच्या मृत्यूनंतर उसळलेली दंगल, मुलूंड लोकल बॉम्बस्फोट, ९ नोव्हेंबर २००८ ची कसाबचा सीएसटी स्थानकावर झालेला हल्ला या घटनांचे ते साक्षीदार आहेत.*

*ज्यावेळी झेवीयर्स कॉलेजमधून पत्रकारीता शिकत होते त्यावेळी महाराष्ट्र भाजपा प्रदेश कार्यालयात जनसंपर्क विभागात काम पाहत होते. लालकृष्ण आडवाणींची रथयात्रा, प्रमोद महाजन, गोपीनाथ मुंडे यांच्या पत्रकार परिषद, प्रचार सभा यांच्या जनसंपर्क व प्रचाराचे काम त्यानी पाहिले आहे.*

*राज्यातील काही खासदार, आमदार, नगरसेवक यांच्या राजकीय प्रचाराची रणनीती ठरवणे, निवडणूक प्रचार धुरा सांभाळणे या राजकीय क्षेत्रातील प्रचार कार्याबरोबर कार्पोरेट क्षेत्रातील पब्लिसीटीचा देखील त्याना अनुभव आहे,*

*व्होडाफोन ४जी, टाटा सेरीन, फोर्टीस हॉस्पीटल, क्युरे हॉस्पीटल, बॉर्नियो हॉस्पीटल, एचड़ीएफसी बँक, ठाणे संस्कृती फेस्टीवल, ठाणे हार्ट लॅन्ड फेस्टीवल, मिस एन्ड मिसेस टिआरा फॅशन शो अश्या अनेक कार्यक्रमांचे कार्पोरेट पीआर त्यानी केले आहे,पी आर क्षेत्रातील त्यांचा अनुभव दांडगा आहे.*

*शैक्षणिक क्षेत्रात राहून ज्या क्षेत्राची आवड आहे त्याचे परिपूर्ण शिक्षण घेण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. आयुर्वेद पंचकर्म, हौसिंग सोसायटी मॅनेजमेंट, सायन्स जर्नालिझम असे विविध कोर्सेस देखील केले आहेत. शिक्षण कधीही फुकट जात नाही...!कोठेकर सर याचे उदाहरण आहेत!*

***कोठेकर सरांना ५० व्या वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!***

***- टीम दिवा न्यूज***


२०
एप्रिल
आपल्या लेखणीच्या माध्यमातून
समाजहिताची पत्रकारिता करणारे,
संयमी,अभ्यासू तसेच
जेष्ठ पत्रकार
श्री. शशिकांत
कोटेकर साहेब यांना
५० व्या वाढदिवसानिमित्त
उदंड आयुष्याच्या
अनंत शुभेच्छा..!
– दिवा न्यूज परिवार

# शिवाई बालक मंदिर शाळेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३२ वी जयंती उत्साहात साजरी




**डोंबिवली:– विश्वभूषण भारतरत्न भारतीय संविधान निर्माते बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३२ वी जयंती शिवाई बालक मंदिर शाळेत उत्साहात साजरी करण्यात आली. सदर कार्यक्रमासाठी प्रसिद्ध साहित्यिक माननीय एन. एस. भालेराव यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.**

सदर कार्यक्रमास शिवाई बालक मंदिर विश्वस्त मंडळ अध्यक्षा सौ. सरिता चंदने मॅडम, सहकार्यवाह सौ. अरुंधती सहस्त्रबुद्धे मॅडम, कोषाअध्यक्षा मा. ॲड.शिल्पा भागवत मॅडम प्राथमिक व माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक, दोन्ही विभागाचे शिक्षक आणि इयत्ता पाचवी ते नववीचे विद्यार्थी उपस्थित होते.

आपल्या मार्गदर्शनामध्ये एन एस भालेराव म्हणाले की,डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवन अनुभव, त्यांना शिक्षण घेताना येणाऱ्या अडचणी व त्यातून त्यांनी काढलेला मार्ग, तसेच देशासाठी भारतीय संविधान देऊन विविध जाती, धर्माच्या लोकांना एकत्र गुंफून राष्ट्र ७६ वर्ष एकसंघ ठेवण्याची मोलाची कामगिरी करून संपूर्ण मानव जातीवर उपकार केले आहेत त्यांनी शिक्षणाचे आणि वाचनाचे महत्त्व त्यांच्या व्याख्यानातून विद्यार्थ्यांना पटवून दिले.

माननीय सौ. विद्याताई गडाख यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले विद्यार्थ्यांना, पालकांना शासकीय योजना आणि सवलती मिळतात, त्यांची थोडक्यात माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माध्यमिक विभागाच्या सहशिक्षिका सौ. वैशाली विभांडिक मॅडम यांनी केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन माध्यमिक विभागाच्या सहशिक्षिका सौ. प्रतिभा भोसले मॅडम केले.

# ठाण्यातील रस्त्यांच्या कामांची डेडलाईन ३१ मे

**ठाणे :** राज्य शासनाकडून प्राप्त झालेल्या २१४ आणि ३९१ कोटींच्या कामांची डेडलाईन ही ३१ मे २०२३ दिलेली आहे. त्यामुळे डिसेंबर महिन्यात सुरू झालेल्या पहिल्या टप्प्यातील रस्त्यांच्या कामांना खऱ्या अर्थाने गती मिळाली असून ही कामे ६० टक्के पूर्ण झाल्याचा दावा ठाणे महापालिकेकडून करण्यात आला आहे. तर फेब्रुवारी महिन्यात सुरू झालेल्या दुसऱ्या टप्प्यातील ही त्या गतीने सुरू असून ही कामे २५ टक्के झाले आहेत. त्यामुळे या दोन्ही टप्प्यातील कामे ३१ मे पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट सार्वजनिक बांधकाम विभागाने ठेवले असल्याची माहिती महापालिकेच्या सूत्रांनी दिली आहे.

मुख्यमंत्र्यांचे बदलते ठाणे या मोहिमेंतर्गत शहरातील रस्त्यांची कामे महापालिकेने युध्द पातळीवर हाती घेतली आहेत. त्यानुसार पहिल्या टप्यात २१४ कोटींची १२७ रस्त्यांची कामे महापालिकेने हाती घेतली आहेत. त्यातील बहुतेक कामे आता टप्यात आली असून ६० टक्के कामे पूर्ण झाल्याचा दावा प्रशासनाने केला आहे. तर दुसऱ्या टप्यात आलेल्या ३९१ कोटींच्या माध्यमातून महापालिकेने पुन्हा १५७ रस्त्यांची कामे हाती घेतली आहेत. ही कामे २५ टक्केच पूर्ण झाली असल्याची माहिती पालिकेच्या सूत्रांनी दिली आहे. यामध्ये सिमेंट, युटीडब्युटी आणि डांबरी अशा पध्दतीने रस्त्यांची कामे करण्यात येणार आहेत. विशेष म्हणजे पहिल्या आणि दुसऱ्या अशा दोन्ही टप्प्यातील निधी ठाणे महापालिकेला प्राप्त झाला असून अद्याप ही बिल देण्याची प्रक्रिया ठाणे महापालिकेकडून सुरु करण्यात आलेली नाही. आयुक्तांच्या निर्देशाप्रमाणे कामांचा दर्जा बघूनच बिले अदा करण्यात येणार असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.

### या कामांमुळे शहरात वाहतूककोंडी

**एकाच वेळेस शहरातील कळवा, मुंब्रा, दिवा,ठाणे शहरातील मध्यवर्ती भाग, वर्तकनगर, लोकमान्य नगर, घोडबंदर भाग आदींसह इतर सर्वच ठिकाणी रस्त्यांची कामे केली जात असल्याने दररोज मोठ्या वाहतूक कोंडीचा सामना ठाणेकरांना करावा लागत आहे.**

# येऊरचे गेट रात्री १० वाजता होणार बंद

**ठाणे :** गेल्या अनेक दिवसांपासून येऊरमधील नंगानाच, डिजेचा कर्णकर्कश आवाज या विरोधात आदिवासींनी एल्गार पुकारला आहे. त्यानंतर वनखाते सक्रीय झाले असून गुरूवारी झालेल्या बैठकीत येऊरमधील प्रवेशासाठी रात्री दहा तर येऊरमधून ठाण्यात परतण्यासाठी रात्री ११ वाजता प्रवेशद्वार बंद करण्यात येणार आहेत. त्यामुळे रात्री ११ ते सकाळी ७ वाजेपर्यंत येऊर मध्ये कोणालाही प्रवेश मिळणार नाही. रात्री ११ नंतर कोणाला येऊर मधून बाहेर ही पडता येणार नाही.

ठाण्याला पश्चिमेला लागून भले मोठे असे संजय गांधी राष्ट्रीय उद्यान लाभले आहे. याच उद्यानात अनेक वन्य प्राणी पक्षी आणि आदिवासी बांधवांचा वावर असतो. मात्र हळूहळू जे जंगल नाहीसे होत चालले असल्याने स्थानिक आदिवासी आता आक्रमक पवित्रा घेतला आहे. ये येथे मोठ्या प्रमाणात रात्रभर सुरू असलेल्या पार्ट्या,ृग चा मोठ्या प्रमाणात आवाज, रात्रभर चालणारे क्रिकेट तर्फ, दारू व अमली पदार्थ विकणे, कचरा जंगलात टाकणे, अनाधिकृत पार्किंगसह येऊर येथे नंगा नाच हे सर्व प्रकार खुलेआम सुरू असून आदिवासीं बांधवांनी 'येऊर जंगल वाचवा' मोहीम सुरू केली आहे. येऊर आदिवासी वनहक्क समितीच्या वतीने आक्रमक पाऊल उचलल्यानंतर चार एप्रिल रोजी वनखाते, ठामपा अधिकारी यांची वनमंत्री सुधीर मुंनगंटीवार यांनी बैठक बोलावली होती.